सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३८ | सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १,५३,५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १,४३,५००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १,१८,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,४२०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**





प्रा. डॉ. एम. बी. चव्हाण
निवृत्त प्राचार्य, अमळनेर



श्री. हृदयनाथ मोरे
पत्रकार



डॉ. स्वप्नाताई पाटील
अमळनेर



श्री. कमलेश भंडारी
अमळनेर

# 'माहेरचा पारिजात' अंतर्गत माहेरवाशिणींनी अनुभवली पक्ष्यांची दुनिया!

## कपिलेश्वर महादेवांचे दर्शन, निसर्गाच्या सान्निध्यात भोजनासह लुटला विविध गुणदर्शनांचा आनंद





*अमळनेर : अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे आयोजित अमळनेरच्या लेकींचा स्नेहमेळा अर्थात 'माहेरचा पारिजात' या उपक्रमांतर्गत रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी नीम (ता. अमळनेर) येथे कपिलेश्वर महादेवांचे दर्शन घेतल्यानंतर अभंग व भजने गायनात रंगलेल्या माहेरवाशिणी. दुसऱ्या छायाचित्रात कपिलेश्वर महादेव मंदिर परिसरातील निसर्गाच्या सान्निध्यात भोजनाचा आस्वाद घेताना माहेरवाशिणी.* (छायाचित्रे : मनिष चौधरी)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहेरच्या अंगणातील बालपणीच्या आठवणींना उजाळा देत, सासर-माहेर दोन्ही कुटुंबांना आपल्या कर्तृत्वाने आणि मायेने समृद्ध करणाऱ्या अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे आयोजित अमळनेरच्या लेकींचा स्नेहमेळा अर्थात 'माहेरचा पारिजात' या उपक्रमाची काल शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सुरूवात झाली. यात दिवसभरातील विविधांगी आनंद लुटल्यानंतर श्री मंगळग्रह मंदिरात सर्व माहेरवाशिणींनी विविध खेळ, नृत्य, गप्पागोष्टींद्वारे रात्र जागून काढली. या उपक्रमासाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे विशेष सहकार्य लाभले आहे.

या स्नेहमेळ्यांतर्गत आज दुसऱ्या दिवशी अर्थात रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी उपस्थित सर्व महिला पहाटे पाच वाजता उठून अतिशय रम्य, शांत, मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात प. पू. संतश्री सखाराम महाराज रोपवाटिकेत फेरफटका मारण्यासाठी गेल्या. सदर रोपवाटिकेत पक्ष्यांसाठी बाराही महिने पिण्याचे पाणी व त्यांना खाण्यासाठी सर्व प्रकारचे धान्य ठेवलेले असते तसेच मंदिर परिसरातील झाडांवर पक्ष्यांना अंडी देण्यासाठी व उबविण्यासाठी तसेच नवजात अर्भकांना सुरक्षित ठेवण्यासाठी सुमारे शंभर मडकी बांधली आहेत. त्यामुळे अनेक प्रकारच्या पक्ष्यांचे मंगळग्रह मंदिर आश्रयस्थान झाले आहे. फेरफटका मारणाऱ्या महिलांना या सर्व प्रकारच्या पक्ष्यांचे दर्शन झाले तसेच पक्ष्यांचे विविध प्रकारचे कर्णमधूर आवाज ऐकून सर्वांनाच मनस्वी आनंद झाला. ही जणू त्यांच्यासाठी सुमधूर सुगंधी सुप्रभात सफर ठरली. यावेळी काहींनी आपले दैनंदिन व्यायामाचे प्रकार तसेच योगसाधना केली. त्यानंतर सर्वांनी स्नानानंतर सकाळी सात वाजता श्री मंगळग्रह देवांची सामूहिकरित्या आरती केली. साडेआठ ते साडेनऊ वाजेदरम्यान अल्पोपहार घेतला. त्यानंतर अमळनेर डेपोच्या बसमधून प्रवास करीत नीम (ता. अमळनेर) येथील तापी, पांझरा व लुप्त गंगा या नद्यांच्या संगमावर वसलेल्या तीर्थक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिरात सकाळी साडेदहा वाजता पोहोचल्या. तेथे सर्वांनी श्रद्धापूर्वक श्री कपिलेश्वर महादेवांचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली. यावेळी काही माहेरवाशिणींनी अभंग व भजने गात आध्यात्मिक सेवाही श्री कपिलेश्वरांच्या चरणी अर्पित केली. दुपारच्या भोजनानंतर जवळपास अर्धातास गप्पागोष्टी, हास्य-विनोदात रंगल्यानंतर बसमधून त्यांनी पुनश्च श्री मंगळग्रह मंदिर गाठले. मंदिरात दुपारी चार वाजेपासून पारंपरिक सागर गोटे, काचा-कवड्या, चौपट, आट्यापाट्या, तळ्यात-मळ्यात, उभा खो-खो, लगोरी, बेसबॉल, आंधळी कोशिंबीर, संगीत खुर्ची आदी खेळ सायंकाळी सहा वाजेपर्यंत खेळले. त्यानंतर सर्वांनी श्री मंगळग्रह सामूहिक सायंआरती केली. सायंकाळी साडेसात वाजेपासून विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. त्यातील मिमिक्रीने सर्वांची मनोसोक्त करमणूक केली. रात्रीच्या भोजनानंतर सर्वांनी शेकोटीसह नृत्य व गायनाचा रात्री उशिरापर्यंत सर्वांनी मनमुराद आनंद घेतला.

यावेळी अमळनेर महिला मंच ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील, सौ. सरोजताई भांडारकर, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे व कोशाध्यक्षा प्रा. सौ. शीलाताई पाटील यांच्यासह कार्यकारी मंडळातील सदस्या उपस्थित होते.

**स्नेहमेळ्यात आज (सोमवार, दि. ३१ ऑगस्ट) होणारे कार्यक्रम**

सकाळी ८.३० वाजता नाश्ता. ९.३० वाजता माहेरवाशिणींचे ओटी भरण व स्नेहमेळ्याचा समारोप.







*अमळनेर : अमळनेर महिला मंच ट्रस्टतर्फे शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी अमळनेरच्याच माहेरवाशिणी असलेल्या सहाय्यक कर निरीक्षक सौ. हर्षाताई साळुंखे यांचा खासदार श्रीमती स्मिताताई वाघ, शहर विकास आघाडीच्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष सन्मान करताना अध्यक्षा सौ. कांचनताई शहा, उपाध्यक्षा सौ. तिलोत्तमाताई पाटील, सचिव सौ. वसुंधराताई लांडगे, सौ. सरोजताई भांडारकर व कार्यकारी मंडळातील सदस्या. दुसऱ्या छायाचित्रात आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलेली मंगळागौर. शेवटच्या छायाचित्रात मंगळागौरच्या गीतांवर नृत्य करताना माहेरवाशिणी.* (छायाचित्रे : नितेश बारी)

# श्री मंगळग्रह मंदिरात आज श्रावणानिमित्त रुद्र महाभिषेक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावणानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी रुद्र महाभिषेक पूजा आयोजित करण्यात आली आहे. या रुद्र महाभिषेक पूजेचे श्री मंगळग्रह मंदिरात सेवा देणारे सर्व पुरोहित मानकरी असतील. सकाळी ९.३० वाजता सर्व पुरोहितांच्या शुभ हस्ते मंदिरातील श्री मंगळेश्वर महादेवाच्या पिंडीवर विधिवत रुद्र महाभिषेकासह पूजा-अर्चना व बिल्वार्चना होईल.

भगवान महादेवांच्या उपासनेसाठी विशेष पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावणातील या धार्मिक विधीमुळे मंदिर परिसरात चैतन्य आणि भक्तीमय वातावरण निर्माण होते, अशी धर्मशास्त्रानुसार मान्यता आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावण मासानिमित्त रुद्र महाभिषेकाचे आयोजन केले जाते. रुद्र महाभिषेकानंतर भाविकांच्या उपस्थितीत महाआरती होऊन रुद्र महाभिषेक पूजेची सांगता होईल. त्यामुळे या पवित्र रुद्र महाभिषेकावेळी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती देऊन दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## मंगळवारी श्री सत्यनारायण महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावणानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या महापूजेचे विशेष मानकरी नगरसेवक अनिल महाजन यांच्या शुभ हस्ते सपत्नीक सकाळी साडेनऊच्या सुमारास या महापूजेची मंत्रच्चारासह विधिवत सुरूवात होईल.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावण मासानिमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले जाते. श्रावण मासातील भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची महापूजा करणे अतिशय पवित्र व पुण्यफल प्राप्तीचे मानले जाते. या काळात वातावरण पूर्णपणे सात्त्विक असते. त्यामुळे या पवित्र महापूजेवेळी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासह तीर्थप्रसादासाठी सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत यावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# मालपूरच्या पशुवैद्यकीय केंद्राला जिल्हाधिकारी घुगे यांची भेट

## पशुपालकांना देण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांचा घेतला आढावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मालपूर येथे कृषी विभागामार्फत शेतीशाळेचे नियोजन करण्यात आले असताना शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी तेथील पशुवैद्यकीय केंद्र श्रेणी-२ येथे आकस्मिक भेट देऊन संपूर्ण कामकाजाची पाहणी केली. या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी घुगे यांनी पशुधनासाठी सुरू असलेल्या आरोग्य सेवा, उपचार व्यवस्था, औषधसाठा, उपलब्ध सुविधा तसेच शेतकरी व पशुपालकांना देण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांची माहिती जाणून घेतली. सध्या सुरू असलेल्या एफएमडी लसीकरणाच्या नवव्या फेरीच्या नियोजनाचाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला.

पशुपालकांच्या दैनंदिन जीवनात पशुधनाचे मोठे महत्त्व असून, पशुधनाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दवाखान्यातील सेवा-सुविधा तसेच प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी केली. यावेळी श्री. घुगे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून शेतकरी व पशुपालकांना अधिक प्रभावी, तत्पर आणि दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा देण्याबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील पशुपालकांना आवश्यक उपचार, लसीकरण आणि आरोग्यविषयक सेवा वेळेत मिळाव्यात, यासाठी कार्यक्षमतेने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी मयूर भंगाळे, जिल्हा कृषी अधीक्षक तडवी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक डॉ. विक्रांत पाटील, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, सरपंच तसेच मालपूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



*अमळनेर : तालुक्यातील मालपूर येथे कृषी विभागामार्फत आयोजित शेतीशाळेस शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी उपस्थित प्रांताधिकारी मयूर भंगाळे, जिल्हा कृषी अधीक्षक तडवी, तालुका कृषी अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक डॉ. विक्रांत पाटील, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, सरपंच तसेच मालपूर येथील ग्रामस्थ.*

# सुसाट स्कुटीची डंपरला धडक; रंजाणेतील दोघांचा जागीच मृत्यू

## अमळनेर-गलवाडे रस्त्यावरील पेट्रोलपंपानजीक दुपारची घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सुसाट स्कुटीची उभ्या डंपरला जोरदार धडक बसल्याने दोन जण जागीच मृत्युमुखी पडले. ही घटना रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी दीडच्या सुमारास शहरातून गलवाडेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पेट्रोलपंपानजीक घडली. मृत दोघे जण रंजाणे (ता. अमळनेर) येथील रहिवासी आहेत.

या अपघाताची माहिती अशी, की रंजाणे (ता. अमळनेर) येथील पंडित धाकू भिल (वय ५०) व नागो अमृत सपकाळे (वय ४५) गलवाडे येथे भंडारा कार्यक्रमासाठी स्कुटीने (एमएच ५४-ई ७६४) गेले होते. पंडित स्कुटी चालवत होता, तर नागो मागे बसला होता. गलवाडे येथून परतीच्या प्रवासात असताना त्यांचे स्कुटीवरील नियंत्रण सुटल्याने ती पेट्रोलपंपाजवळील रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या डंपरला (एमएच १८-एम ७८५७) जाऊन जोरदार धडकली. ही धडक एवढी जोरात होती की पंडितची मान आणि हात कापले जाऊन त्याचे शरीर धडावेगळे झाले, तर नागोलाही जोरदार मार लागल्यामुळे दोघेही जागीच मृत्युमुखी पडले.



पंडित भिल



नागो सपकाळे

या घटनेचे वृत्त कळताच अमळनेर विभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, उपनिरीक्षक समाधान गायकवाड, नामदेव बोरकर, हवालदार चंद्रकांत पाटील, वाहतूक शाखेचे पोलीस संजय बोरसे, विनय पाटील, मयूर पाटील, गणेश पाटील, अविनाश भदाणे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह विच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. यावेळी रंजाणे येथून आलेल्या नातेवाईक मंडळींनी घटनास्थळी जोरदार आक्रोश केला.

## संपादकीय

### माणसांसाठी सण की सणांसाठी माणूस ?

माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे, असे म्हणतात. उत्सवांमागे काही ना काही कारण असते. उदा.- ऋतूबदलाची सुरूवात, पिकांच्या हंगामाचे दिवस, ऐतिहासिक घटना वगैरे. नेहमीच्या कष्टमय आणि रटाळ जीवनात असे उत्सव, सण रंगत आणतात, आनंद देतात आणि ते साजरे केल्यावर माणूस नव्या उत्साहाने पुढील जीवन जगायला सिद्ध होतो. भारतीयांची उत्सवप्रियता तर अफाटच आहे. आपल्याकडील बहुसंख्य उत्सवांना, सणांना काही ना काही पौराणिक, ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असल्याने ते भक्तिभावाने साजरे केले जातात. काही सण हे प्रादेशिक असतात. काही सण कुटुंबात, तर काही सार्वजनिक स्वरूपात साजरे केले जातात. परंतु आपल्या जीवनात रंगत आणणाऱ्या, आनंद देणाऱ्या सण, उत्सवांचे, विशेषतः सार्वजनिक उत्सवांचे स्वरूप गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बदलले असून ते जनतेला आनंद देण्याऐवजी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष यातना देणारे ठरत आहेत. त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे आणि चर्चा करणे आवश्यक ठरते. ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात लोकांमध्ये जागृती, एकजूट निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खरेतर या उत्सवाची तशी आवश्यकता उरली नव्हती. परंतु या उत्सवानिमित्त लोकांनी एकत्रित येणे, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा आस्वाद घेणे होत असल्याने सार्वजनिक गणेशोत्सव लोकांनी चालूच ठेवले. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीही सार्वजनिक स्वरूपात साजरी होत होती आणि होत आहे. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य महापुरुषांच्या जयंतीही धूमधडाक्यात साजऱ्या होऊ लागल्या आहेत. गेल्या काही दशकांपासून या सण-उत्सव-जयंती यांचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. त्यातील सोज्वळता, धार्मिकता, आदर हे सारे मागे पडू लागले आहे. आता डॉल्बी-डीजे, लेजर, नाशिक ढोल-ताशे, गॅस सिलिंडरपासून बनविलेल्या मोठ्या घंटा यांचा वापर होतो. गुजरातमधून आलेला गरबा, उत्तरेकडील छटपूजाही आता महाराष्ट्रात जोर धरू लागली आहे. कावड यात्रा सुरू व्हावी, अशी काही धर्माभिमानी लोकांची मागणी आहे. 'ईद-ए-मिलाद' या हजरत महम्मद पैगंबर यांच्या जयंती-उत्सवानिमित्त मुस्लीम बांधव बऱ्याच ठिकाणी मिरवणूक काढतात.

सार्वजनिक गणेशोत्सव, गरबा, जयंती यांना बऱ्याचदा कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्याचे किंवा छोट्या-मोठ्या उद्योजकांचे प्रायोजकत्व लाभलेले असते. कधी-कधी अंडरवर्ल्ड डॉन सुद्धा या उत्सवांचे प्रायोजक, आश्रयदाते असतात. त्यामुळे उत्सवांना पैशाची कमतरता भासत नाही. परिणामी उत्सव अधिक खर्चिक झाले आहेत. प्रायोजकत्व आले की प्रायोजकांचे मोठमोठे बॅनर्स आलेच. शिवाय सजावटीवर आणि दिखाव्यांवर अफाट पैसा खर्च केला जाऊ लागला आहे. मूर्तीची उंची वाढू लागली आहे. त्यात सणांचे पावित्र्य हरवले आहे. उत्सवांचे व्यापारीकरण झालेले आहे. बरेच सार्वजनिक उत्सव रस्त्यावर साजरे केले जातात. त्यांच्या पूर्वतयारीसाठी आधी आठवडाभर आणि उत्सवानंतर आठवडाभर रस्ते पूर्णतः किंवा अंशतः बंद असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. मिरवणुकांमुळे वाहतूक ठप्प असते. या उत्सवांमधील सर्वांत धोकादायक प्रकार म्हणजे डॉल्बी डीजे आणि गॅस सिलिंडरपासून बनविलेल्या मोठ्या घंटा. यातून निघणारा आवाज एवढा मोठा असतो, की डीजेची गाडी जवळून गेल्यास इमारतीतील भिंती, खिडक्यांची तावदाने हादरतात, माणूस स्वतः हादरतो. डीजेमुळे मृत्यू आल्याच्या बातम्याही आल्या आहेत. वृद्ध, बालके, गर्भवती महिला, रुग्ण यांचे तर खूपच हाल होतात. गणेशमूर्ती बनविताना रासायनिक रंग वापरले जातात. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती तर रासायनिक प्रक्रियेनेच बनतात. या मूर्तींचे विसर्जन आपल्या वापराच्या जलस्रोतात केल्यास ते पाणी प्रदूषित होते. असे प्रदूषित पाणी प्यायल्याने कॅन्सरसारखे दुर्धर आजार होऊ शकतात. पाण्यातील जीवसृष्टीवरही त्याचा वाईट परिणाम होतो. प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्तीवर बंदी येऊ नये म्हणून प्रकरण न्यायालयात नेले आहे. मिरवणुकीत जो गुलाल मुक्तपणे उधळला जातो त्यात असलेले शिसे आरोग्यासाठी धोकादायक असते. मिरवणूकप्रसंगी आणि उत्सवस्थळी फोडले जाणारे फटाके अत्यंत विषारी वायू उत्सर्जित करतात. या सर्व प्रकारच्या प्रदूषणाचा त्रास सर्वांनाच होतो. काही मंडळे आपला गणपती नवसाला पावतो म्हणून दावा करतात. त्यामुळे अशा ठिकाणी भक्तांची एकच झुंबड उडते. हे एकप्रकारे अंधश्रद्धेला दिले जाणारे प्रोत्साहनच आहे.

या उत्सवांना धार्मिक उन्मादाचे स्वरूप आल्याने मिरवणुकीच्या मार्गालगत असलेल्या अन्य धर्मीय प्रार्थनास्थळांसमोर मिरवणूक येते तेव्हा प्रचंड तणाव निर्माण झालेला असतो. त्या ठिकाणी जास्तीत जास्त वेळ मोठा आवाज करून नाचणे हे हल्ली भूषणावह मानले जाते. ती वेळ पोलीस दलांसाठी परीक्षेची असते. काही दिवसांपूर्वी एक भव्य मूर्ती उत्सव-स्थळी घेऊन जात असताना ती कोसळल्याने दोघांचा मृत्यू झाला आणि पाच लोक जखमी झाले. त्यामुळे अशा भव्य मूर्ती निर्माण करण्याची खरोखरच आवश्यकता आहे का, यावर देखील चर्चा झाली पाहिजे. बदलत्या काळानुसार सण-उत्सव सुद्धा बदलले पाहिजेत, हे कोणीही मान्य करेल. परंतु ज्या पद्धतीने हल्ली सण-उत्सव साजरे केले जातात त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास, पर्यावरणास धोका निर्माण होत आहे. हे पाहून प्रश्न पडतो की हे सण, उत्सव माणसांसाठी आहेत की सणांसाठी माणूस आहे? विज्ञानाने लावलेल्या विविध शोधांचा, उदा.- डॉल्बी डीजे, लेजर लाइट, प्रकाश योजना यांचा विधायक उपयोग करण्याऐवजी विघातक पद्धतीने का केला जातो आहे? बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा, साध्या कॉमन सेन्सचा वापर का केला जात नाही? परंपरेचा अभिमान उठसूठ सांगणारे बांधव उत्सवांची धार्मिक, पवित्र परंपरा का पाळत नाहीत? या बदललेल्या उत्सवांना सकारात्मक, सुखद, स्वरूप देण्यासाठी नागरिक पुढाकार का घेत नाहीत? पुणे येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि महापालिका पदाधिकारी यांच्या बैठकीत एका सूज्ञ नागरिकाने डीजेमुक्त गणेशोत्सव साजरे करावेत, अशी सूचना केली असता मंडळांचे पदाधिकारी अत्यंत आक्रमक झाले, चिडले आणि बैठकीत प्रचंड गोंधळ माजला. शेवटी त्या नागरिकास सुरक्षारक्षकांच्या गराड्यात बाहेर काढण्यात आले. नागरिकांना आपल्या उत्सवामुळे त्रास होत आहे. त्यांना डीजेचा आवाज नको आहे. याबाबत थोडी तरी संवेदनशीलता दाखवायला हे मंडळांचे पदाधिकारी तयार नाहीत. महापालिका पदाधिकारी देखील मंडळांचीच री ओढत मंडळांना मुक्त परवाना देत आहेत. आता उत्सवस्थळाजवळील लोक, एकेकाळी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा उत्सव कधी एकदाचा संपतो याची दरवर्षीप्रमाणे असहाय्यपणे वाट पाहत राहतील ती गणराया, पुढच्या वर्षी येताना तरी या मंडळांना सद्बुद्धी दे, अशी प्रार्थना करत.

# प्रभाग क्र. १६ मध्ये नाला झाला अरुंद; पुराचा धोका वाढला!

## अतिक्रमणाविरोधात 'राष्ट्रवादी'चे भूषण भदाणे आक्रमक; निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर (प्रतिनिधी) : गेल्या ३१ जुलै २०२६ रोजीच्या अतिवृष्टीमुळे अमळनेर शहरातील अनेक भागांना पुराचा तडाखा बसला. त्यानंतर आता नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहावर झालेल्या कथित अतिक्रमणांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शहरातील प्रभाग क्र. १६ मधून जाणाऱ्या पिंपळे नाल्याची नैसर्गिक रुंदी कमी करून काही ठिकाणी अनधिकृत भराव व बांधकाम करण्यात आले आहे, अशा आशयाचा गंभीर आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे यांनी केला आहे. या नाल्याचा प्रवाह अरुंद झाल्यास भविष्यात पावसाचे पाणी आडविले जाऊन परिसरात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याने प्रशासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात जळगाव येथे निवासी उपजिल्हाधिकारी वैशालीताई चव्हाण यांची भेट घेऊन श्री. भदाणे यांनी त्यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे, की पिंपळे नाल्याची महसूल विभाग, पालिका आणि भूमी अभिलेख या विभागांच्या अधिकाऱ्यांमार्फत संयुक्त मोजणी करून नाल्याची मूळ हद्द व नैसर्गिक रुंदी निश्चित करावी. नवकार सिटी, अष्टविनायकनगर, संत प्रसाद नगर आणि गुरुकृपा कॉलनी परिसरात नाल्यात भराव टाकून त्याची रुंदी कमी करण्यात आली आहे. काही ठिकाणी नाल्याचा प्रवाह केवळ सुमारे तीन मीटरच्या अरुंद चॅनलमधून ठेवण्यात आली आहे. त्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी आल्यास त्याचा नैसर्गिक निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी चव्हाण यांच्यासह जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, प्रांताधिकारी, अमळनेर पालिकेचे मुख्याधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. आता प्रशासनाकडून या तक्रारीवर कोणती भूमिका घेतली जाते आणि नाल्याची संयुक्त मोजणी करून कथित अतिक्रमणांची वस्तुस्थिती कधी स्पष्ट केली जाते, याकडे प्रभाग क्र. १६ मधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### ३१ जुलैच्या पुरानंतर प्रश्न पुन्हा ऐरणीवर

गेल्या ३१ जुलै २०२६ रोजी अमळनेर शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पाणी साचून पूरस्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर नाल्यांच्या प्रवाहातील अडथळे आणि कथित अतिक्रमणांचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी परिसराची पाहणी केली असता नागरिक व व्यापाऱ्यांनी नाल्याच्या अरुंदीकरणामुळे पाण्याचा निचरा प्रभावित होत असल्याची तक्रार केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची प्रतीक्षा न करता प्रशासनाने नाल्याची प्रत्यक्ष मोजणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी भूषण भदाणे यांनी केली आहे.

### सात दिवसांत कारवाई करा, अन्यथा उपोषण

पिंपळे नाल्याची प्रत्यक्ष मोजणी, पंचनामा आणि आवश्यक कारवाई सात दिवसांच्या आत करण्यात यावी, अशी मागणीही श्री. भदाणे यांनी केली आहे. या मुदतीत प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई न झाल्यास प्रभाग क्र. १६ मधील नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल, असा इशाराही श्री. भदाणे यांनी दिला आहे.




*अमळनेर : गेल्या ३१ जुलै २०२६ रोजीच्या अतिवृष्टीमुळे अमळनेर शहरातील अनेक भागांना पुराचा तडाखा बसला. त्यानंतर आता नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहावर झालेल्या कथित अतिक्रमणांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शहरातील प्रभाग क्र. १६ मधून जाणाऱ्या पिंपळे नाल्याची नैसर्गिक रुंदी कमी करून काही ठिकाणी अनधिकृत भराव व बांधकाम करण्यात आले आहे, अशा आशयाच्या आरोपाचे निवदेन जळगावात निवासी उपजिल्हाधिकारी वैशालीताई चव्हाण यांना देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे.*



*अमळनेर : महाराष्ट्र राज्य एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २९ ऑगस्ट रोजी येथे तालुका बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र ठाकूर, एकलव्य संघटनचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गुलाब बोरसे, जळगाव जिल्हाध्यक्ष सुनील पवार, जिल्हा उपाध्यक्ष हिलाल गायकवाड, जिल्हा युवा उपाध्यक्ष रमेश सोनवणे, जिल्हा कार्याध्यक्ष विनायक सोनवणे, अमळनेर तालुकाध्यक्ष भय्या सोनवणे ऊर्फ भुराभाऊ, तालुका उपाध्यक्ष आबा बहिरम, पारोळा तालुका उपाध्यक्ष किशोर वाघ, शहराध्यक्ष सुधाकर पवार, शहर उपाध्यक्ष धनराज मालचे, रावण ग्रुपचे अध्यक्ष नरेश चव्हाण, उपाध्यक्ष अजयभाऊ, सदस्य ज्ञानेश्वरभाऊ, तालुका युवा अध्यक्ष अजय मालचे, तालुका सचिव पूनम सिंग, चांदणी कुऱ्हे, टाकरखेडे गटप्रमुख नाना बोरसे, टायगर फोर्स अध्यक्ष आबा गायकवाड, मंगरूळ गटप्रमुख आकाश पवार, तालुका उपसचिव सुनील ठाकरे, मांडळ गटप्रमुख प्रवीण भिल, जानवे गटप्रमुख भरत भिल, अजय भिल, आकाश भिल आदी.*

# एकलव्य संघटनेच्या तालुका बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा

## नवीन पदाधिकारी नियुक्त; दफनभूमी, घरकुल, रेशनकार्ड, आधारकार्ड यांचा घेतला आढावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र राज्य एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २९ ऑगस्ट रोजी येथे तालुका बैठक घेण्यात आली. बैठकीत संघटनेच्या विविध नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

बैठकीत तालुक्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये दफनभूमी, घरकुल, रेशन कार्ड, आधार कार्ड, वनजमीन, गायरान जमीन, गावठाण जमीन यांसह शहर व ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध मूलभूत समस्यांचा आढावा घेण्यात आला. शहर तसेच गावांमध्ये अनेक समस्या दीर्घकाळापासून प्रलंबित असून, संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करून त्या सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे आवाज उठविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. समाजातील पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजना व मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी संघटित प्रयत्न करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र ठाकूर, तर एकलव्य संघटनचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गुलाब बोरसे, जळगाव जिल्हाध्यक्ष सुनील पवार, जिल्हा उपाध्यक्ष हिलाल गायकवाड, जिल्हा युवा उपाध्यक्ष रमेश सोनवणे, जिल्हा कार्याध्यक्ष विनायक सोनवणे, अमळनेर तालुकाध्यक्ष भय्या सोनवणे ऊर्फ भुराभाऊ, तालुका उपाध्यक्ष आबा बहिरम, पारोळा तालुका उपाध्यक्ष किशोर वाघ, शहराध्यक्ष सुधाकर पवार, शहर उपाध्यक्ष धनराज मालचे, रावण ग्रुपचे अध्यक्ष नरेश चव्हाण, उपाध्यक्ष अजयभाऊ, सदस्य ज्ञानेश्वरभाऊ, तालुका युवा अध्यक्ष अजय मालचे, तालुका सचिव पूनम सिंग, चांदणी कुऱ्हे, टाकरखेडे गटप्रमुख नाना बोरसे, टायगर फोर्स अध्यक्ष आबा गायकवाड, मंगरूळ गटप्रमुख आकाश पवार, तालुका उपसचिव सुनील ठाकरे, मांडळ गटप्रमुख प्रवीण भिल, जानवे गटप्रमुख भरत भिल, अजय भिल, आकाश भिल यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या माध्यमातून समाजाच्या हक्कांच्या प्रश्नांसाठी संघटना आगामी काळात अधिक आक्रमकपणे काम करणार असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# मातोश्रीनगरातील चामुंडामाता मंदिरात चोरी

## दानपेटीतून ३५ हजारांची रोकड, सोन्याची आभूषणे लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मातोश्रीनगर परिसरातील चामुंडामाता मंदिरात शुक्रवार, दि. २८ ऑगस्टच्या रात्री चोरट्यांनी मंदिराच्या मुख्य दरवाजाचे लॉक तोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी मंदिरात प्रवेश करून दानपेटी व कपाटांची तोडफोड केली. यात मातेच्या अंगावरील सोन्याची आभूषणे तसेच दानपेटीतील अंदाजे ३० ते ३५ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले, की चामुंडामाता मंदिर सकाळी उघडण्यासाठी गेल्यानंतर चोरीचा प्रकार पुजाऱ्याच्या निदर्शनास आला. मुख्य दरवाजाचे लॉक तुटलेले, दानपेटीची तोडफोड झालेली, कपाटे उघडी आणि आतील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले आढळून आले. पाहणीत मातेच्या अंगावरील दोन सुवर्णहार, अंदाजे एक ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या टिकल्या आणि अंदाजे पाच ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या बांगड्या, तसेच दानपेटीतील रोकड चोरीस गेल्याचे दिसून आले. या घटनेची पत्रकार व अर्जदार हितेंद्र जगन्नाथ बडगुजर यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात



लेखी माहिती दिली. त्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच घटनास्थळी पंचनामा करून ठसे व इतर भौतिक पुरावे जतन करावेत, मंदिर परिसरासह आजूबाजूच्या भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासावेत आणि चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करून आरोपींचा शोध घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**पाच दिवसांत दुसरी घटना**

मातोश्रीनगर परिसरात मागील पाच दिवसांत चोरीची ही दुसरी घटना असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. सलग चोरीच्या घटनांमुळे परिसरात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीची पोलीस गस्त वाढवून चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या घटनांचा तपास अमळनेर पोलीस करीत आहेत.

# पथविक्रेत्यांच्या तक्रारींसाठी समिती स्थापन

## न्यायाधीश वाजे अध्यक्ष; चेतन राजपूत, नितीन कोल्हे सदस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेंतर्गत पथविक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण आणि वादांवर निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमळनेर न्या. व्ही. ए. वाजे, तर सदस्यपदी अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन राजपूत आणि मॉडर्न इन्स्टिट्यूटचे संचालक नितीन कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे यासंदर्भातील पत्र बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी अमळनेर पालिकेस प्राप्त झाले. समितीचा कार्यकाळ पाच वर्षांचा राहणार आहे. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) अधिनियम, २०१४ तसेच महाराष्ट्र पथविक्रेता नियम, २०१६ नुसार प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणे आवश्यक आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या निर्देशांच्या अनुषंगाने ही समिती गठीत करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील सर्व पालिका व नगरपंचायतींसाठी स्वतंत्र समित्या स्थापन करण्यात आल्या असून, पथविक्रेत्यांच्या तक्रारी व वादांवर नियमानुसार कार्यवाही करण्याचा मार्ग यामुळे सुकर होणार आहे.

# रक्ताचे नाते नसूनही ऐश्वर्या 'या' अभिनेत्याला दरवर्षी बांधते राखी

## चित्रपटात दोघांनी साकारली होती भाऊ-बहिणीची भूमिका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने ऐश्वर्या आणि या अभिनेत्याचे भाऊ-बहिणीचे नाते पुन्हा चर्चेत आले आहे. बॉलिवूडमधील पडद्यावर सुरू झालेले नाते प्रत्यक्ष आयुष्यातही इतकी वर्षे टिकणे चाहत्यांसाठी नक्कीच खास आहे.



बॉलिवूडमध्ये काही नाती ही रक्ताची नसली तरी काळाच्या ओघात ती तितकीच घट्ट होतात. अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिनेता सोनू सूद यांचे नाते याचे उत्तम उदाहरण आहे. दोघांनी २००८ मध्ये आलेल्या 'जोधा अकबर' या सिनेमात भाऊ-बहिणीची भूमिका साकारली होती.

विशेष म्हणजे या ऑनस्क्रीन नात्याचे रूपांतर खऱ्या आयुष्यातही भाऊ-बहिणीच्या नात्यात झाले. आजही ऐश्वर्या सोनूला राखी बांधते. आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'जोधा अकबर'मध्ये हृतिक रोशन आणि ऐश्वर्या राय मुख्य भूमिकेत होते. ऐश्वर्याने जोधाची भूमिका साकारली होती, तर सोनू सूदने तिच्या भावाची म्हणजेच सुजामलची भूमिका केली होती. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान दोघांमध्ये चांगली मैत्री निर्माण झाली आणि त्यानंतर त्यांचे नाते भाऊ-बहिणीचे झाले. 'जोधा अकबर'च्या शूटिंगदरम्यानच ऐश्वर्याने सोनूला पहिल्यांदा राखी बांधली होती, असे म्हटले जाते. त्यानंतर हे नाते पुढेही कायम राहिले आणि रक्षाबंधनाच्या दिवशी ऐश्वर्या सोनूला राखी बांधत असल्याचे सांगितले जाते.

सोनू सूदने एका जुन्या मुलाखतीत ऐश्वर्यासोबतच्या या खास नात्याचा किस्सा सांगितला होता. त्याने सांगितले होते, की 'जोधा अकबर'च्या सुरूवातीच्या शूटिंगदरम्यान ऐश्वर्या काहीशी शांत आणि राखीव स्वभावाची होती. मात्र एका सीनच्या शूटिंगदरम्यान तिने अचानक सोनूला सांगितले, की तुम्ही मला पप्पांची (अमिताभ बच्चन) आठवण करून देता.

या घटनेनंतर दोघांमध्ये आणखी आपुलकी निर्माण झाली. सोनूने सांगितले होते, की ऐश्वर्या आजही त्याला 'भाई साहब' म्हणून हाक मारते. सोनू सूदचा बच्चन कुटुंबाशी केवळ ऐश्वर्यामुळेच संबंध नाही. त्याने अमिताभ बच्चन यांच्यासोबत 'बुड्ढा होगा तेरा बाप', तर अभिषेक बच्चनसोबत 'युवा' आणि 'हॅप्पी न्यू ईयर'मध्ये काम केले आहे. त्यामुळे बच्चन कुटुंबासोबत सोनूचे एक वेगळे आणि जिव्हाळ्याचे नाते असल्याचे त्याने स्वतःही सांगितले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अशी बना यश खेचून आणणारी व्यक्ती!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कधी-कधी आपण एखादे काम सुरू करतो. सुरूवातीला उत्साह असतो. काही दिवस प्रयत्नही होतात. पण अडचण आली, अपेक्षित परिणाम मिळाला नाही किंवा दुसऱ्याचे यश दिसले की मनात एक विचार येतो, “कदाचित हे माझ्यासाठी नाही.”

याच ठिकाणी दोन व्यक्तींमध्ये फरक निर्माण होतो. एक व्यक्ती परिस्थितीला आपली मर्यादा मानते. दुसरी व्यक्ती परिस्थितीकडे पुढे जाण्यासाठी मिळालेली माहिती म्हणून पाहते. यशस्वी व्यक्ती नेहमी नशीबवान असते असे नाही. अनेकदा तिच्याकडे एक वेगळी मानसिक पद्धत असते. ती अडचणी आल्या तरी स्वतःच्या कृतीवर लक्ष ठेवते, चुका समजून घेते आणि पुन्हा प्रयत्न करण्याची क्षमता विकसित करते.

### यशाची सुरूवात स्वत:बद्दलच्या विश्वासापासून होते

मानसशास्त्रात Self-efficacy, म्हणजे एखादे विशिष्ट काम आपण करू शकतो, असा स्वतःच्या क्षमतेवरील विश्वास ही महत्त्वाची संकल्पना आहे. मानसशास्त्रज्ञ अल्बर्ट बंडुरा यांच्या सिद्धांतानुसार हा विश्वास आपल्या निवडी, प्रयत्न, चिकाटी आणि भावनिक प्रतिक्रियांवर परिणाम करू शकतो.

उदा.- दोन व्यक्तींना नवीन कौशल्य शिकायचे आहे. पहिली व्यक्ती म्हणते, “मला हे जमत नाही.” दुसरी म्हणते, “आता जमत नाही, पण शिकता येईल.”

दोघांची क्षमता कदाचित सुरूवातीला सारखीच असेल. पण दुसरी व्यक्ती अधिक काळ प्रयत्न करण्याची शक्यता असते. महत्त्वाचे म्हणजे हा आत्मविश्वास केवळ स्वतःला चांगले बोलून निर्माण होत नाही. स्वतः केलेल्या छोट्या प्रयत्नांतून आणि मिळालेल्या अनुभवांतून तो मजबूत होतो. संशोधनात स्वतःच्या यशस्वी अनुभवांना आत्म-कार्यक्षमतेचा विशेष महत्त्वाचा स्रोत मानले गेले आहे. म्हणूनच मोठे यश मिळण्याची वाट पाहण्याऐवजी छोटी कामे पूर्ण करण्याची सवय महत्त्वाची ठरते.

### अपयश म्हणजे निर्णय नाही, माहिती आहे

आपल्यापैकी अनेकजण एका अपयशाचा अर्थ “मी अपयशी आहे” असा लावतात. ही विचार करण्याची पद्धत धोकादायक ठरू शकते. कारण एका अनुभवावरून आपण स्वतःबद्दल कायमचा निष्कर्ष काढतो.

समजा एखाद्या तरुणाने स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि पहिल्यांदा यश मिळाले नाही. तो म्हणतो, “माझ्यात क्षमता नाही.” पण दुसरा तरुण विचारतो, “कुठे कमी पडलो? अभ्यासाची पद्धत चुकीची होती का? वेळेचे नियोजन कमी पडले का? कोणत्या विषयावर अधिक काम करण्याची गरज आहे?”

दुसऱ्या व्यक्तीने अपयशाकडे स्वतःच्या मूल्याचा पुरावा म्हणून पाहिले नाही. त्याने त्यातून माहिती घेतली. याच दृष्टिकोनातून Growth mindset, म्हणजे क्षमता प्रयत्न, योग्य पद्धती, अनुभव आणि मार्गदर्शनातून विकसित होऊ शकते असा दृष्टिकोन, समजून घेता येतो. मात्र संशोधन असेही दाखवते की



growth mindset चा परिणाम प्रत्येक व्यक्तीमध्ये सारखा दिसत नाही. त्यामुळे “फक्त विचार बदला आणि यश मिळेल” असे म्हणणे योग्य नाही. योग्य वातावरण, संधी आणि प्रभावी कृतीही महत्त्वाच्या आहेत.

### यशस्वी व्यक्ती ध्येयापेक्षा प्रक्रियेकडेही पाहते

“मला यशस्वी व्हायचे आहे” हे ध्येय आहे. पण त्यासाठी दररोज काय करायचे, हा खरा प्रश्न आहे.

उदाहरणार्थ, वजन कमी करायचे आहे असे म्हणणे सोपे आहे. पण रोज किती चालायचे, आहारात काय बदल करायचा, झोप कशी सुधारायची आणि प्रगती कशी तपासायची, याची योजना नसली तर केवळ इच्छा पुरेशी ठरत नाही.

मानसशास्त्रीय संशोधनात ध्येय, आत्म-कार्यक्षमता आणि स्वतःच्या प्रगतीचे निरीक्षण यांचा प्रेरणा आणि कामगिरीशी संबंध आढळतो. म्हणून “मला मोठे यश मिळवायचे आहे” याऐवजी “आज मी कोणते एक महत्त्वाचे काम पूर्ण करणार?” हा प्रश्न अधिक उपयोगी ठरतो.

### तुलना कमी करा, स्वत:ची प्रगती मोजा

सोशल मीडियामुळे इतरांचे यश सतत आपल्या डोळ्यासमोर असते. कोणाची नोकरी लागली, कोणाचा व्यवसाय वाढला, कोणाचे घर झाले, कोणाला पुरस्कार मिळाला. अशा वेळी आपले आयुष्य मागे पडल्यासारखे वाटू शकते. पण आपण इतरांच्या आयुष्यातील परिणामाची तुलना आपल्या आयुष्यातील प्रक्रियेशी करत असतो. ही तुलना अनेकदा वास्तव दाखवत नाही.

त्याऐवजी स्वतःला विचारा-

“गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत मी कुठे सुधारलो आहे?” हा प्रश्न आत्म-जागरूकता वाढवतो आणि लक्ष पुन्हा स्वतःच्या प्रवासाकडे आणतो.

### अडचण आली की भावना नव्हे, कृती तपासा

यशस्वी व्यक्तीला भीती, निराशा किंवा चिंता वाटत नाही असे नाही. फरक एवढाच की त्या भावनांनंतर ती काय करते.

एखाद्या व्यवसायात नुकसान झाले तर एक व्यक्ती घाबरून निर्णय घेऊ शकते. दुसरी व्यक्ती आधी थांबते, परिस्थिती समजून घेते आणि मग पुढचा निर्णय घेते.

याला भावनिक नियमन म्हणता येईल. म्हणजे भावना दाबणे नव्हे, तर भावना ओळखून तिच्या प्रभावाखाली लगेच निर्णय न घेणे. भावना महत्त्वाची माहिती देतात. पण प्रत्येक भावना कृती करण्याचा आदेश नसते.

### यश खेचून आणण्यासाठी काय कराल?

दररोज काही छोट्या मानसिक सवयी विकसित करता येतात. पहिली, ध्येय स्पष्ट करा. तुम्हाला नेमके काय साध्य करायचे आहे ते लिहा. दुसरी, मोठ्या ध्येयाचे छोटे टप्पे करा. छोट्या यशस्वी अनुभवांमुळे स्वतःच्या क्षमतेवरील विश्वास मजबूत होऊ शकतो.

तिसरी, चुकीनंतर स्वतःला दोष देण्याऐवजी विश्लेषण करा. “मी चुकीचा आहे” ऐवजी “माझ्याकडून कुठे चूक झाली?” असा प्रश्न विचारा.

चौथी, प्रगतीची नोंद ठेवा. आपण किती पुढे आलो आहोत हे दिसले की प्रयत्न सुरू ठेवणे सोपे होते.

पाचवी, योग्य लोकांच्या सहवासात राहा. इतरांचे अनुभव, मार्गदर्शन आणि प्रोत्साहनही आपल्या विश्वासावर परिणाम करू शकतात.

### शेवटी एक महत्त्वाचा प्रश्न

यश खेचून आणणारी व्यक्ती म्हणजे प्रत्येक वेळी जिंकणारी व्यक्ती नव्हे.

ती अशी व्यक्ती असते जी हरल्यानंतर स्वतःबद्दलचा निर्णय लगेच घेत नाही.

ती अडचणींना ओळखते. स्वतःच्या चुका स्वीकारते. गरज पडल्यास पद्धत बदलते. छोट्या प्रगतीकडे लक्ष देते आणि पुन्हा प्रयत्न करते.

कदाचित तुमच्या आयुष्यातही एखादे ध्येय आहे, जे तुम्ही खूप दिवसांपासून पुढे ढकलत आहात.

### आज स्वत:ला एकच प्रश्न विचारा-

“माझ्या यशाच्या मार्गात अडथळा परिस्थिती आहे की माझ्याबद्दलची माझीच धारणा?”

या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर कदाचित तुमचा संपूर्ण प्रवास बदलणार नाही. पण पुढचे एक पाऊल नक्की बदलू शकते.

आणि अनेक मोठ्या बदलांची सुरुवात एवढ्याच एका छोट्या पावलापासून होते.

# आजीच्या संघर्षमय आयुष्याला अनोखा निरोप!

## अंत्ययात्रेत बॅण्डसह फटाक्यांची आतषबाजी; नाती झाल्या खांदेकरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गावात सकाळपासून बॅण्डचा आवाज घुमत होता. फटाक्यांची आतषबाजी सुरू होती. एखाद्या उत्सवाची मिरवणूक निघाल्याचा भास व्हावा, असे चित्र होते. मात्र, ही मिरवणूक होती एका माउलीच्या अंत्ययात्रेची. आयुष्यभर कष्ट करून मुलाला घडविणाऱ्या शांताबाई कारभारी काळे यांना त्यांच्या कुटुंबीयांनी आनंदाने आणि सन्मानाने अखेरचा निरोप दिला. विशेष म्हणजे त्यांच्या नाती सई आणि राजनंदिनी यांनी आजीच्या पार्थिवाला खांदा देत आपले कर्तव्य बजावले.

सावेडी गावासाठी सोमवारची सकाळ भावनिक ठरली. शांताबाई काळे यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. गावात ‘बाई’ या नावाने परिचित असलेल्या शांताबाईंच्या निधनाने सर्वांनाच चटका बसला. त्यांच्या आयुष्याचा संघर्ष आणि मुलाला घडविण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट गावकऱ्यांना माहीत होते.

### पतीच्या निधनानंतर खचल्या नाहीत

शांताबाईंचा विवाह १९७१ मध्ये झाला. त्यानंतर वर्षभराने मुलगा राजेंद्र यांचा जन्म झाला. मात्र, अवघ्या सात वर्षांत पतीचे अकाली निधन झाले आणि कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी शांताबाईंच्या खांद्यावर आली. पतीच्या निधनाचा मोठा धक्का बसला असतानाही त्यांनी परिस्थितीसमोर हार मानली नाही. वडील आणि भावाने काही काळ त्यांना आधार दिला. मात्र, उदरनिर्वाहासाठी शांताबाईंना काम करावे लागले. त्यांनी बेकरीत पाव भाजण्याचे काम सुरू केले. त्यासाठी त्यांना अवघा ७० रुपये मासिक पगार मिळत होता. त्यातूनच मुलगा राजेंद्र यांचे शिक्षण सुरू ठेवले. पुढे वडिलांचेही निधन झाले आणि आधाराचे आणखी एक छत्र हरपले. त्यानंतर त्यांनी धुणी-भांडी करण्याचे कामही केले.

### अंत्ययात्राही आनंदाने निघावी

आईने आयुष्यभर कष्ट केले. तिच्या वाट्याला सुखापेक्षा संघर्षच अधिक आला. त्यामुळे अखेरच्या प्रवासात तरी तिच्या चेहऱ्यावर आनंद असावा, या भावनेतून काळे परिवाराने शांताबाईंची अंत्ययात्रा वेगळ्या पद्धतीने काढण्याचा निर्णय घेतला. बॅण्डच्या तालात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत अंत्ययात्रा निघाली. दुःखाचा प्रसंग असतानाही कुटुंबीयांनी आईच्या संघर्षमय जीवनाला सन्मानाची मानवंदना दिली. या वेळी नाती सई आणि राजनंदिनी यांनी आजीच्या पार्थिवाला खांदा देत तिच्या अखेरच्या प्रवासात सहभाग घेतला. शांताबाईंच्या संघर्षाची आणि मुलाला घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या त्यागाची ही भावनिक पावती ठरली.

### मुलाच्या शिक्षणासाठी स्वत:च्या गरजा बाजूला ठेवल्या

राजेंद्र यांना चांगले शिक्षण मिळावे, हेच शांताबाईंचे आयुष्याचे ध्येय बनले होते. राजेंद्र यांना उच्च शिक्षणासाठी पुण्याला पाठविण्यात आले. त्यावेळी शांताबाईंचा मासिक पगार सुमारे ७०० रुपये होता. त्यापैकी तब्बल ५०० रुपये त्या मुलाच्या शिक्षणासाठी खर्च करीत. आईच्या कष्टांची जाणीव ठेवत राजेंद्र यांनीही जिद्दीने शिक्षण पूर्ण केले आणि ते सीए झाले. शांताबाईंनी पंचवीस वर्षे उराशी बाळगलेले स्वप्न अखेर साकार झाले. पुढे राजेंद्र यांनी समाजकार्यातही योगदान दिले आणि ते अहिल्यानगर सीए असोसिएशनचे अध्यक्ष झाले. त्यांच्या पत्नी मनिषा याही महापालिकेत नगरसेविका झाल्या.

### सुखाचे दिवस पाहिले, पण अमृत महोत्सव राहून गेला

आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या शांताबाईंना मुलगा स्थिरावल्यानंतर सुखाचे दिवस अनुभवता आले. त्यांना अध्यात्माची विशेष आवड होती. त्यामुळे राजेंद्र यांनी आईला देशातील विविध प्रमुख धार्मिक स्थळांच्या दर्शनाची यात्रा घडवून आणली. शांताबाईंचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचीही कुटुंबाची इच्छा होती. मात्र, त्यापूर्वीच त्यांचे निधन झाल्याने हे स्वप्न अपूर्ण राहिले.



# वन डे क्रिकेटमध्ये ‘झीरो’वर आऊट न झालेले दिग्गज खेळाडू

## लिस्टमध्ये भारतीय स्टारचाही समावेश!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदिवसीय क्रिकेटमध्ये कोणत्याही फलंदाजासाठी खाते न उघडता म्हणजेच ‘झीरो’वर पॅव्हेलियनमध्ये परतणे हा अत्यंत निराशाजनक अनुभव असतो. मात्र, क्रिकेटच्या इतिहासात असे काही फलंदाज होऊन गेले आहेत, ज्यांनी आपल्या संपूर्ण वन डे कारकिर्दीत एकदाही शून्यावर आपली विकेट गमावली नाही. या अनोख्या आणि विशेष विक्रमाच्या यादीत अव्वल स्थानावर केप्लर वेसेल्स यांचे नाव येते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका अशा दोन्ही देशांकडून खेळलेल्या वेसेल्स यांनी तब्बल १०५ वन डे डावांमध्ये फलंदाजी केली, पण ते कधीही ‘डक’चा शिकार झाले नाहीत. त्यांनी या काळात ३,३६७ धावा केल्या.

या यादीत दुसऱ्या क्रमांकावर न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिचेल आहे. ज्याने ५७ वनडे डावांत फलंदाजी करताना २,८११ धावा केल्या असून तो एकदाही शून्यावर आऊट झालेला नाही. तर तिसऱ्या क्रमांकावर पाकिस्तानचा सलमान अली आगा असून त्याने ४५ डावांत १,५६६ धावा करत डकचा सामना केलेला नाही.

### भारतीय स्टारचाही यादीत समावेश

भारताकडून या ऐतिहासिक विक्रमात यशपाल शर्मा यांचे नाव अव्वल स्थानी आहे. १९७८ ते १९८५ दरम्यान आपल्या वन डे कारकिर्दीत यशपाल शर्मा यांनी ४० डावांमध्ये फलंदाजी केली आणि ते एकदाही शून्यावर बाद झाले नाहीत. या दरम्यान त्यांनी ८८३ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेच्या पीटर कर्स्टन यांनीही ४० वन डे डावांत १,३९३ धावा करत एकदाही शून्याचा सामना केला नाही.याव्यतिरिक्त दक्षिण आफ्रिकेच्या जॅक रुडॉल्फने ३९ डावांत १,१७४ धावा आणि आयर्लंडच्या कर्टिस कॅम्फरने ३९ डावांत फलंदाजी करत हा पराक्रम गाजविला आहे.

### या खेळाडूंचाही विक्रमात समावेश

**नेथन हॉरिट्झ :** ३२ डाव, ३३६ धावा
**गजानंद सिंग (यूएसए) :** ३२ डाव, ९८६ धावा
**जॅक रसेल :** ३१ डाव
**टॉम कूपर :** ३१ डाव

### भारतीय खेळाडूंमध्ये कोण पुढे?

भारताकडून शून्यावर बाद न होता सर्वाधिक वन डे डाव खेळण्याचा विक्रम यशपाल शर्मा (४० डाव) यांच्या नावावर आहे. तर या यादीत दुसऱ्या क्रमांकावर भारताचा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर येतो, जो आतापर्यंत २३ डावांत फलंदाजी करताना एकदाही शून्यावर आऊट झालेला नाही.

### क्रिकेट जगतातील अनोखा पराक्रम

कसोटी असो वा वन डे, कोणत्याही फलंदाजासाठी ही कामगिरी अत्यंत दुर्मिळ मानली जाते. सततच्या दबावाखाली खेळताना एकदाही ‘झीरो’वर आऊट न होणे ही या फलंदाजांच्या सातत्यपूर्ण कामगिरीची प्रचिती देते.

# १४ साल की उम्र में शादी, १८ साल में बनी २ बच्चों की मां

## फिर चौथे प्रयास में ऐसे बनीं ‘आयपीएस’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एन अंबिका तमिलनाडू की रहने वाली हैं। जब वो महज १४ साल की थी, तब उनकी शादी एक पुलिसव वाले से हो गई। फिर १८ साल की उम्र आते-आते तो वह दो बच्चों की मां बन गईं।

कहते हैं कि किसी हुनर को सीखने या फिर पढ़ाई करने की कोई उम्र नहीं होती है। जब जागो तभी सबेरा। कुछ ऐसी ही कहानी है आईपीएस एन अंबिका की। जिन्होंने उस वक्त अपने जीवन और करियर को नई दिशा देने की कोशिश की, जहां पहुंचकर ज्यादातर लोगों को लगता है, अब कुछ नहीं कर सकते हैं। यूपीएससी की सिविल सर्विस परीक्षा देश की कठिन परीक्षाओं में से एक है। जिसे क्रैक करने के बाद लोग आईएएस और आईपीएस बनते हैं। इसे क्रैक करना आसान नहीं होता है। उम्मीदवारों को खूब मेहनत करनी पड़ती है। एन अंबिका ने भी जब इसे क्रैक करना का सपना देखा, तो उन्हें इस बात का बिल्कुल पता नहीं था, वो इसे क्रैक कर पाएंगी। क्योंकि उनके सामने एक नहीं बल्कि कई ऐसी चुनौतियां थी, जो इस सपने को हकीकत में बदलने के लिए बाधा बन रही थी। कम उम्र में शादी, फिर २ बच्चों की मां बनीं, १०वीं के बाद पढ़ाई छूट जाना जैसी तमाम चुनौतियां थीं, लेकिन इसके बावजूद उन्होंने यूपीएससी क्रैक करने की सोची। चलिए आज सक्सेस स्टोरी में हम एन अंबिका के बारे में जानते हैं।

### कौन हैं एन अंबिका

एन अंबिका तमिलनाडू की रहने वाली हैं। जब वो महज १४ साल की थी, तब उनकी शादी एक पुलिसव वाले से हो गई। फिर १८ साल की उम्र आते-आते तो वह दो बच्चों की मां बन गईं। इतना ही नहीं उन्होंने कक्षा १०वीं की भी छोड़ दिया। क्योंकि शादी के बाद उनकी जिम्मेदारियां बढ़ गई। यहां तक सबकुछ ठीक चल रहा था, लेकिन एक घटना ने उनकी तस्वीर बदल दी और उन्हें आईपीएस बनने का प्रेरणा भी मिल गई थी।

### इस घटना ने बदली जिंदगी

दरअसल, वो गणतंत्र दिवस के मौके पर

**सक्सेस स्टोरी**

अपने पति के साथ एन अंबिका पुलिस परेड देखने पहुंची। उसने वहां पुलिस ऑफिसर को मिलने वाला सम्मान देखा और ये सोचा कि मैं किस तरह ये सम्मान पा सकती हूं। बस यही घटना उनके सिर पर सवार हो गया। इस बारे में जब उन्होंने अपने पति से बात की, तो उन्होंने बताया कि ये सम्मान मिलना इतना आसान नहीं है। इसके लिए कड़ी मेहनत की जरूरत होती है। ये सब जानने के बाद एन अंबिका ने ना सिर्फ दोबारा पढ़ाई शुरू करने की ठानी, बल्कि सिविल सर्विसेस की इंट्रेंस एग्जाम क्लियर करने का भी फैसला कर लिया।

### दोबारा से शुरू की पढ़ाई

मीडिया रिपोट्र्स की मानें, तो एन अंबिका ने सबसे पहले १० वीं की परीक्षा पास की। इसके बाद डिस्टेंस लर्निंग से १२वीं की और फिर ग्रेजुएशन किया। इसके बाअंबिका ने अपनी यूपीएससी परीक्षा की तैयारी शुरू की।

### ऐसे की यूपीएससी की तैयारी

वो एक छोटे से कस्बे में रहती थी, जहां पर यूपीएससी की तैयारी के लिए कोई भी कोचिंग सेंटर नहीं था। इसके बात फिर उन्होंने चेन्नई में रहकर यूपीएससी परीक्षा की तैयारी करने का निर्णय लिया। यहां उनके पति ने भी पूरा साथ दिया। वे खुद नौकरी के साथ बच्चों की देखभाल करने लगे।

### ३ बार यूपीएससी में फेल

चेन्नई में रहते हुए अंबिका ने खूब मेहनत की लेकिन वे दो बार इस एग्जाम को क्लियर नहीं कर सकीं। जब तीसरी बार भी वे पास नहीं हुई तो उनके परिवार वालों ने उन्हें लौट आने को कहा। लेकिन अंबिका ने हार नहीं मानी। अंबिका ने एक और कोशिश करने को लेकर अपने परिजनों को मनाया। जिसके बाद अंबिका ने साल २००८ में अपना चौथा प्रयास कियाष इस बार अत्यधिक मेहनत कर परीक्षा पास की। इसके बाद वह आईपीएस अफसर बन गईं।

### पहली पोस्टिंग

मीडिया रिपोट्र्स के मुताबिक, उनकी पहली पोस्टिंग महाराष्ट्र में हुई। फिर २०१९ में उन्हें डिप्टी कमिश्नर ऑफ पुलिस का पद मिला। बता दें कि सख्त कार्यशैली के लिए लोग उन्हें लेडी सिंघम के नाम से भी जाने लगें।









# यंदा संकष्टी चतुर्थीला जुळले दुर्मिळ योग!

## ५ राशी भाग्यशाली; शुभ मुहूर्त, चंद्रोदय वेळ, पूजा पद्धत, महत्त्व जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'संकष्टी' म्हणजे संकटांचा नाश करणारी. ऑगस्ट महिन्यातील शेवटची संकष्टी चतुर्थी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी आहे. हा दिवस भगवान श्रीगणेशांच्या उपासनेसाठी अत्यंत शुभ मानला गेला आहे. हिंदू पंचांगानुसार प्रत्येक पौर्णिमेनंतर येणाऱ्या कृष्ण पक्षातील चतुर्थीला संकष्टी चतुर्थी साजरी केली जाते. भगवान श्रीगणेश हे हिंदू धर्मातील सर्वप्रथम पूजले जाणारे, बुद्धी, विवेक, ज्ञान, समृद्धी आणि विघ्नहर्ता देवता मानले जातात. अशा या बाप्पांना समर्पित हा दिवस आहे. पंचांग आणि ज्योतिषशास्त्रानुसार ऑगस्ट महिन्याच्या शेवटी येणारी संकष्टी चतुर्थी अत्यंत विशेष आणि दुर्मिळ आहे. कारण या दिवशी अत्यंत शुभ योग जुळून आले आहेत. जाणून घेऊया या संकष्टी चतुर्थीचे महत्त्व, भाग्यशाली राशी, योग्य तिथी, चंद्रोदय वेळ, पूजेची पद्धत.

**संकष्टी चतुर्थी आणि श्रावणी सोमवारचा दुर्मिळ योग**

वैदिक पंचांगानुसार यंदा ३१ ऑगस्ट २०२६ रोजी भक्तांसाठी विशेष धार्मिक पर्वणी असणार आहे. या दिवशी संकष्टी चतुर्थी आणि श्रावणी सोमवार एकाच दिवशी आल्याने गणेशभक्त तसेच शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीगणेशांची पूजा, उपवास आणि चंद्रोदयाच्या वेळी गणेशदर्शन करण्याची परंपरा आहे. त्याच दिवशी श्रावणी सोमवार असल्याने भगवान महादेवांची पूजा, अभिषेक, बेलपत्र अर्पण आणि 'ॐ नमः शिवाय'चा जप करण्यासाठी शिवमंदिरांमध्ये भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे.

**संकष्टी चतुर्थी तिथी**

चतुर्थी तिथी सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८:५० वाजता सुरू होणार आहे.

चतुर्थी तिथी मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७:४१ वाजता समाप्त होईल.



उदयतिथीनुसार चतुर्थी तिथी १ सप्टेंबर २०२६ रोजी येत आहे. मात्र, हेरंब संकष्टी चतुर्थीचा उपवास ३१ ऑगस्ट २०२६ रोजी केला जाणार आहे.

यामुळे ३१ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावणी सोमवार आणि हेरंब संकष्टी चतुर्थी, असा विशेष धार्मिक योग आहे.

**संकष्टी चतुर्थी- चंद्रोदयाची वेळ**

पंचांगानुसार यंदा संकष्टी चतुर्थीच्या दिवशी चंद्रोदय रात्री ८:२९ वाजता होईल. धार्मिक मान्यतेनुसार संकष्टी चतुर्थीचा उपवास हा चंद्राची पूजा आणि प्रार्थना केल्याशिवाय अपूर्ण आहे. संकष्टी चतुर्थीच्या उपवासात लोक चंद्रोदयाची वाट पाहतात.

**श्रीगणेशांच्या पूजेवेळी काय अर्पण कराल?**

२१ दुर्वा, लाल किंवा जास्वंदाचे फूल, मोदक किंवा लाडू, शेंदूर आणि अक्षता, तुपाचा दिवा लावून 'ॐ गं गणपतये नमः' या मंत्राचा जप करावा.

**या दिवशी काय कराल?**

* सकाळी स्नान करून श्रीगणेशांचे पूजन करावे.
* शक्य असल्यास दिवसभर उपवास ठेवावा.
* चंद्रोदयानंतर चंद्राला अर्घ्य देऊन श्रीगणेशांची आरती करून उपवास सोडावा.
* गणपती अथर्वशीर्ष, संकटनाशक श्रीगणेश स्तोत्र किंवा श्रीगणेश चालिसाचे पठण करणे शुभ मानले जाते

**संकष्टी चतुर्थी : 'या' ५ राशींसाठी ठरणार भाग्यशाली**

मेष : कामातील अडथळे दूर होऊन नवीन संधी मिळण्याची शक्यता. आर्थिक बाबतीत सकारात्मक बदल होऊ शकतो.

सिंह : आत्मविश्वास वाढेल. आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल आणि मान-सन्मान मिळू शकतो.

तूळ : गणपतीच्या कृपेने मनातील एखादी इच्छा पूर्ण होण्याची शक्यता. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

धनू : करिअरमध्ये प्रगतीचे संकेत असून नवीन कामाची सुरुवात करण्यासाठी दिवस अनुकूल ठरू शकतो.

मीन : अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता. मानसिक तणाव कमी होऊन सकारात्मक ऊर्जा जाणवेल.

# त्र्यंबकेश्वर : बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त्वपूर्ण ज्योतिर्लिंग!

## जेथे ब्रह्मा, विष्णू आणि महेश एकाच लिंगात एकवटले आहेत...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

त्र्यंबकेश्वर हे महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक या छोट्याशा गावात, ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले शिवमंदिर आहे. भगवान शिव यांच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे एक अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, महाराष्ट्रातील तीन ज्योतिर्लिंगांपैकी (भीमाशंकर, घृष्णेश्वर आणि त्र्यंबकेश्वर) एक आहे. या स्थानाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे भारतातील पवित्र गोदावरी नदीचा उगम येथील ब्रह्मगिरी पर्वतावर मानला जातो. ज्यामुळे या क्षेत्राला केवळ शैव नव्हे, तर नदी-तीर्थ म्हणूनही विशेष स्थान प्राप्त झाले आहे. गावाभोवती ब्रह्मगिरी, नीलगिरी आणि गंगाद्वार अशा तीन टेकड्या असून, प्रत्येकीशी वेगळी पौराणिक कथा व देवता जोडलेली आहे.

पौराणिक संदर्भानुसार असे सांगितले जाते, की ब्रह्मदेवांनी येथे एका पर्वतावर श्री महादेवांना प्रसन्न करण्यासाठी तप केले जे पुढील काळात 'ब्रह्मगिरी पर्वत' नावाने विख्यात झाले. या पर्वतावर एके काळी गौतम ऋषींचा आश्रम होता.

शिवपुराण व स्कंदपुराणातील नाशिक-कौशिकी खंडात या ज्योतिर्लिंगाच्या स्थापनेमागील कथा तपशीलवार वर्णिली आहे. या पौराणिक आख्यायिकेनुसार एकेकाळी ब्रह्मगिरी परिसरात महर्षी गौतम आपल्या पत्नी अहिल्येसह तपोवनात वास्तव्य करत होते. या तपोवनात राहणाऱ्या इतर ऋषींच्या पत्नींना गौतम ऋषींच्या तपस्येचा व समृद्धीचा हेवा वाटू लागला. त्यांनी कपटाने गौतम ऋषींवर गोहत्येचा (गाईच्या हत्येचा) आळ घेतला एक भ्रामक गाय निर्माण करून तिला गौतम ऋषींच्या हातून मारवले गेले, असा कट रचला गेला.

या कथित पापाचे परिमार्जन करण्यासाठी गौतम ऋषींनी ब्रह्मगिरी पर्वतावर कठोर तपश्चर्या आरंभली. भगवान शंकर त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न झाले आणि प्रत्यक्ष दर्शन देऊन वर मागण्यास सांगितले. गौतम ऋषींनी दोन गोष्टी मागितल्या एक, आपल्या जटांमधील पवित्र गंगा नदी (जी पुढे गोदावरी अथवा गौतमी नावाने ओळखली गेली) येथे प्रवाहित व्हावी, जेणेकरून मृत गाय गंगेच्या जलधारांनी जीवंत होईल आणि दोन, शंकरांनी स्वतः याच स्थानी कायमचे वास्तव्य करावे. भगवान शिवांनी दोन्ही विनंत्या मान्य करून येथे ज्योतिर्लिंगाच्या रूपात स्थिरावण्याचे मान्य केले. गौतम ऋषींच्या विनंतीवरून महादेव इथे त्रिमूर्ती होऊन ज्योतिर्लिंग स्वरूपात विराजमान झाले. तीच जागा आजचे त्र्यंबकेश्वर.

गौतम ऋषींच्या तपाने गंगेला धरतीवर आणले, आणि त्याच पुण्यभूमीत शिवांनी स्वतःला ज्योतिर्लिंगाच्या रूपात बद्ध करून घेतले ही या क्षेत्राची मूळ कथा आहे.

त्र्यंबकेश्वर हे नाव संस्कृत त्रि-अंबक (तीन नेत्र असलेला) या शब्दावरून आले आहे. गर्भगृहातील लिंग इतर ज्योतिर्लिंगांहून वेगळे आहे येथे एका खळग्यात तीन लहान सुपारीच्या आकाराचे नैसर्गिक स्वयंभू लिंगे स्पष्ट दिसतात, जी ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तींचे प्रतीक मानली जातात. भाविकांच्या मते या लिंगांतून सतत जलबिंदू झिरपत राहतात हे या स्थानाचे एक स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. पौराणिक कथांच्या पलीकडे सध्याच्या मंदिर वास्तूला ठोस ऐतिहासिक व पुरातत्वीय आधार आहे बांधकामाच्या नोंदी, दानपत्रे आणि अलीकडील उत्खनन-संवर्धन कार्यातून हे स्पष्ट होते.

सध्याचे भव्य मंदिर तिसरे पेशवे बाळाजी बाजीराव (नानासाहेब पेशवे) यांनी बांधले. काम इ.स. १७५५ मध्ये सुरू होऊन तब्बल ३१ वर्षांनी १७८६ मध्ये पूर्ण झाले. त्या काळात अंदाजे १६ लाख रुपये खर्च आल्याची ऐतिहासिक नोंद आहे. सह्याद्रीच्या घडीव काळ्या पाषाणात (बेसाल्ट) कोरलेले हे बांधकाम मराठा-पेशवेकालीन मंदिर-स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना मानले जाते. हे मंदिर भूमिज शैलीमध्ये बांधलेले असून, दाक्षिणात्य शैलीच्या चार प्रवेशद्वारे असलेल्या तटबंदीमध्ये पूर्व दिशेकडे तोंड केलेले आहे. मंदिराची रचना नंदीमंडप, अर्धमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी आहे. काळ्या पाषाणाच्या जाळीदार गवाक्ष असलेल्या नंदीमंडपात संगमरवरी नंदी मूर्ती बसवण्यात आलेली आहे.

मंदिर चार प्रवेशद्वारे असलेल्या, फरसबंद केलेल्या विस्तीर्ण आवारात उभे आहे. गर्भगृहातील त्रिमूर्ती-लिंगाच्या पूर्वेस पार्वतीदेवीची संगमरवरी मूर्ती आहे, तर प्रवेशाशी शुभ्र संगमरवरातील नंदी विराजमान आहे. सर्वसामान्य भाविकांना गर्भगृहाबाहेरून दर्शन घेता येते; विशेष पूजा करणाऱ्यांनाच आत प्रवेश दिला जातो.
मंदिराच्या भिंती अष्टदिक्पाल आणि इतर देवतांच्या सुबक शिल्पांनी समृद्ध आहेत.
सभामंडपात देवकोष्ठात उमा महेश, महिषासुरमर्दिनी, वीरभद्र, विष्णू इ च्या मुर्त्या आहेत. अंतराळाच्या वितानावर मल्लयुद्ध खेळताना कुस्तीगीर कोरलेले आहेत. तर गर्भगृहाच्या दरवाजाच्या दोन्ही बाजू शैव द्वारपाल, तपस्वी, विविध वाद्ये वाजविणारे कलाकार व व्याल आणि शुक यांच्या शिल्पाकृतींनी अलंकृत केलेल्या आहेत.

मंदिराच्या फरसबंदी आवारात नैऋत्येला एक बांधीव कुंड आहे. त्याला 'अमृतकुंड' नावाने ओळखले जाते. या कुंडातील पाणी श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाच्या पूजेसाठी व अभिषेकासाठी वापरले जाते. मंदिरातील शिवमूर्तीच्या अलंकरणासाठी जगप्रसिद्ध 'नासिक डायमंड' वापरण्यात आल्याची नोंद आहे. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात ब्रिटिशांनी मंदिराची लूट केली, त्यात हा हिरा घेऊन गेले. पेशव्यांचे सरदार अण्णासाहेब विंचूरकर यांनी मंदिराला सुवर्णकळस व पंचधातूचा ध्वज अर्पण केल्याचीही ऐतिहासिक नोंद मिळते.

पेशव्यांनी बांधलेले सध्याचे मंदिर उभारण्यापूर्वी याच जागी एक जुने शिवालय अस्तित्वात होते, असे अनेक ऐतिहासिक व स्थानिक संदर्भ सांगतात. मराठी परंपरेनुसार हे मूळ मंदिर दहाव्या शतकातील शिलाहार राजा झंझ या शिवभक्त राजाने उभारले होते झंझ राजाने कोकण व उत्तर महाराष्ट्र भागात अनेक शिवमंदिरे बांधल्याची नोंद परंपरेत आढळते. पुढे मुघल आक्रमणांच्या (औरंगजेबाच्या दख्खन मोहिमांच्या) काळात हे जुने मंदिर उद्ध्वस्त झाल्याचे मानले जाते, आणि त्यानंतर सुमारे शतकभराने नानासाहेब पेशव्यांनी १७५५ मध्ये सध्याच्या भव्य मंदिराचे बांधकाम हाती घेतले.

**कालरेषा ठळक ऐतिहासिक टप्पे**

प्राचीन काळ : गोदावरी नदीचे उगमस्थान व शैव तीर्थक्षेत्र म्हणून पौराणिक व साहित्यिक उल्लेख; परिसरातील गुंफा-स्थापत्य (पांडवलेणी) इ.स.पूर्व काळातील अस्तित्वाचा पुरावा देते. इ.स. १० वे शतक (परंपरागत) : शिलाहार राजा झंझ याने या स्थानी मूळ शिवालय उभारल्याची स्थानिक परंपरा निश्चित शिलालेखीय पुराव्याअभावी हा दावा पारंपरिक मानला जातो.
मुघल काळ : औरंगजेबाच्या दख्खन मोहिमांदरम्यान जुने मंदिर उद्ध्वस्त झाल्याचे मानले जाते; पुढील शतकभर हे स्थान जीर्णावस्थेत राहिले.
वर्तमान काळ : श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टकडून मंदिराचे व्यवस्थापन एएसआयकडून सुरू असलेले संवर्धन कार्य.

त्रिमूर्ती दर्शन : एकाच ज्योतिर्लिंगात ब्रह्मा-विष्णू-महेश यांचे एकत्रित दर्शन हे बारा ज्योतिर्लिंगांत त्र्यंबकेश्वरचे वेगळेपण आहे.
कालसर्प दोष व नारायण-नागबली : या पूजाविधींसाठी त्र्यंबकेश्वर देशभरातून भाविकांना आकर्षित करते.
सिंहस्थ कुंभमेळा : नाशिक-त्र्यंबकेश्वर हे बारा वर्षांतून एकदा भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे एक प्रमुख केंद्र आहे.
आदि शंकराचार्यांचा संबंध : अनेक परंपरांनुसार आदि शंकराचार्यांनी या क्षेत्राला भेट देऊन नजीक मठाची स्थापना केल्याचे मानले जाते.

# श्रावणातील तिसऱ्या सोमवारी मूग का अर्पण करतात?

## काय आहे यामागील धर्मशास्त्रीय संकेत, आध्यात्मिक महत्त्व आणि पूजाविधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिना म्हणजे भगवान शिव यांच्या उपासनेचा पवित्र काळ. या महिन्यातील प्रत्येक सोमवार शिवभक्तांसाठी विशेष मानला जातो. महाराष्ट्रातील अनेक भागांत श्रावणातील प्रत्येक सोमवारी भगवान शिव यांना विशिष्ट धान्याची 'शिवमूठ' वाहण्याची परंपरा आहे. त्यापैकी तिसऱ्या सोमवारी 'मूग' शिवमूठ म्हणून अर्पण करण्याची प्रथा आढळते. ही केवळ धान्य अर्पण करण्याची रूढी नसून त्यामागे भक्ती, सात्त्विकता, अन्नदानाची भावना, निसर्गाप्रती कृतज्ञता आणि मनाच्या शुद्धीचा सुंदर आध्यात्मिक संदेश दडलेला आहे.

**'शिवमूठ' म्हणजे काय?**

'मूठ' म्हणजे आपल्या हातात मावेल एवढे धान्य. भक्ताने आपल्या सामर्थ्यानुसार धान्याची एक मूठ भगवान शिव यांना अर्पण करणे, याला 'शिवमूठ' असे म्हणतात. महाराष्ट्रातील लोकपरंपरेत श्रावणातील सोमवारी वेगवेगळ्या धान्यांचे अर्पण करण्याची प्रथा रूढ आहे. तिसऱ्या सोमवारी मूग अर्पण केला जातो, अशी महाराष्ट्रातील प्रचलित शिवमूठ परंपरा आहे. काही प्रदेशांमध्ये धान्यांच्या क्रमात किंवा पूजाविधीत स्थानिक परंपरेनुसार फरक आढळू शकतो. त्यामुळे आपल्या कुलाचारानुसार किंवा स्थानिक धार्मिक परंपरेनुसार विधी करणेही योग्य मानले जाते.

**मुगाचे आध्यात्मिक प्रतीकात्मक महत्त्व**

मूग हे सात्त्विक, पचण्यास हलके आणि आरोग्यदायी धान्य मानले जाते. भारतीय संस्कृतीत अन्नाला 'ब्रह्म' मानले आहे. त्यामुळे अन्नधान्य देवांना अर्पण करण्यामागे 'ईश्वराने दिलेले अन्न पुन्हा ईश्वरचरणी समर्पित करणे' असा भाव आहे. मुगाचा हिरवा रंग हा निसर्ग, जीवन, प्रसन्नता आणि नवचैतन्याशी जोडला जातो. श्रावणातील हिरवाईच्या पार्श्वभूमीवर मूग अर्पण करणे म्हणजे सृष्टीतील जीवनदायी शक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, असा त्याचा आध्यात्मिक अर्थ लावता येतो.
'शिवमूठ' अर्पण करताना भक्ताने केवळ धान्य हातात धरू नये; तर अहंकार, चिंता, मोह आणि नकारात्मक विचार यांचीही एक 'मूठ' शिवचरणी अर्पण करावी, हा या उपासनेचा अंतर्मुख करणारा संदेश आहे.

**धर्मशास्त्रीय दृष्टिकोन**

श्रावणातील शिवोपासनेत अभिषेक, बिल्वपत्रार्पण, जप, उपवास, दान आणि अन्नधान्य अर्पण यांना महत्त्व आहे. शिवपूजेचा मूलभूत भाव हा श्रद्धा आणि समर्पण आहे. पूजेत वापरले जाणारे द्रव्य हे साधन असून, त्यामागील भक्तिभावाला अधिक महत्त्व दिले जाते. शैव उपासनेत शिवांना जल, दुग्ध, बिल्वपत्र, धोतरा, आक इत्यादी पूजाद्रव अर्पण करण्याची परंपरा विविध आगम, पुराणपरंपरा आणि लोकाचारांत दिसते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शिवमूठ ही लोकधर्म आणि भक्तिपरंपरेत विकसित झालेली धार्मिक प्रथा म्हणून पाहता येते. म्हणून 'मूग वाहिल्याने अमुकच फळ निश्चित मिळते' असा कठोर शास्त्रीय दावा करण्यापेक्षा सात्त्विक अर्पण, संयम, दान, भक्ती आणि आत्मशुद्धी हा या विधीचा मुख्य आध्यात्मिक आशय समजून घेणे अधिक उचित ठरते.


**तिसऱ्या सोमवारी मूग शिवमूठ वाहण्याचा पूजाविधी**

श्रावणातील तिसऱ्या सोमवारी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. शक्य असल्यास उपवास किंवा फलाहाराचा संकल्प करावा. त्यानंतर घरातील देवघरातील शिवलिंगाची किंवा जवळच्या शिवमंदिरातील शिवलिंगाची श्रद्धेने पूजा करावी.

**पूजेची पद्धत**

**१) संकल्प :** शांतपणे बसून भगवान शिव यांचे ध्यान करावे. आपल्या मनातील इच्छा किंवा प्रार्थना व्यक्त करून, श्रद्धेने शिवपूजा व शिवमूठ अर्पण करण्याचा संकल्प करावा.
**२) शिवलिंगाचे शुद्धीकरण :** स्वच्छ पाण्याने शिवलिंगावर जलाभिषेक करावा. आपल्या परंपरेनुसार पंचामृताने अभिषेक करावयाचा असल्यास तो करता येतो. त्यानंतर पुन्हा स्वच्छ जल अर्पण करावे.
**३) बिल्वपत्र अर्पण :** शिवलिंगावर स्वच्छ बिल्वपत्र अर्पण करावे. बिल्वपत्र अर्पण करताना मनोभावे 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राचा जप करावा.
**४) मूग शिवमूठ अर्पण :** स्वच्छ मूग यांची एक मूठ हातात घ्यावी. त्यावेळी मनात अशी भावना ठेवावी 'हे महादेव, माझ्या जीवनातील अहंकार, अज्ञान, चिंता आणि दोष आपल्या चरणी समर्पित करीत आहे. माझे मन सात्त्विक, निर्मळ आणि शिवमय होऊ द्या.' यानंतर मूग शिवलिंगावर किंवा शिवपिंडीसमोर श्रद्धेने अर्पण करावेत. शिवलिंगावर धान्य अर्पण करण्याची आपल्या घरची किंवा मंदिराची पद्धत नसेल, तर ते शिवलिंगासमोर ठेवावे.
**५) मंत्रजप :** 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राचा शक्य तितका जप करावा. तसेच महामृत्युंजय मंत्र, शिवमहिम्न स्तोत्र किंवा आपल्या परंपरेतील शिवस्तोत्राचे पठण करता येते.
**६) नैवेद्य व आरती :** फळे, नैवेद्य किंवा घरच्या सात्त्विक पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. त्यानंतर भगवान शिव यांची आरती करावी.
**७) प्रार्थना आणि प्रसाद :** शेवटी कुटुंबाच्या आरोग्य, समाधान, सद्बुद्धी आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रार्थना करावी.
अर्पण केलेले धान्य मंदिराच्या प्रथेप्रमाणे वापरावे किंवा गरजू व्यक्तीस अन्नदानासाठी देण्याची भावना ठेवावी.

शिवमूठीतून मिळणारा आध्यात्मिक संदेश
शिवपूजेचा खरा अर्थ केवळ बाह्य विधीमध्ये नसून स्वतःच्या अंतर्मनातील परिवर्तनात आहे. हातातील मूठभर मूग हे आकाराने छोटे असले, तरी त्यातून 'माझ्याकडे असलेले सर्व काही ईश्वरकृपेने मिळाले आहे' हा भाव जागृत होतो. मूठ बंद केली की त्यात धान्य साठते; पण तीच मूठ उघडून ईश्वरचरणी अर्पण केली की समर्पणाचा अर्थ कळतो. म्हणून शिवमूठ ही भक्ताला 'संचयापेक्षा समर्पण श्रेष्ठ' आणि 'अहंकारापेक्षा भक्ती श्रेष्ठ' असा संदेश देते.



**अन्नदानाशी जोडलेली परंपरा**

भारतीय संस्कृतीत अन्नदानाला मोठे महत्त्व आहे. भगवान शिव यांना मूग अर्पण केल्यानंतर ते केवळ कर्मकांड म्हणून न पाहता त्यातून अन्नाचा आदर आणि गरजूला अन्न देण्याची वृत्ती विकसित झाली तर शिवोपासनेचा सामाजिक आशयही साकारतो. भगवान शिव हे वैराग्य, करुणा आणि समत्वाचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे शिवमूठ अर्पण करताना 'माझे कल्याण' एवढ्यापुरती प्रार्थना न करता 'सर्व जीवांचे कल्याण होवो' अशी प्रार्थना करणे हीच शिवभक्तीची व्यापक दिशा ठरते.
' हर हर महादेव! ।

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**